*अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा पुरावा*

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की —

**माझे नांव** : संगिता दादाभाउ थोरात,
**वय** : ४५ वर्षे, **धंदा** : शेती,
**राहणार** : कमेवाडी, ता.शिरूर, जि.पुणे.

**सरतपासणी: अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदम :**

**१.** घटना हि दिनांक ०५/१०/२०१६ रोजी सकाळी ८.३० वाजताच्या दरम्यान आरोपीच्या दारासमोर घडली. त्या दिवशी माझे पती दुचाकी वाहनाने गावात जात होते. त्यावेळी मी माझ्या अंगणामध्ये उभी होती. माझे पती आरोपीच्या दारासमोर असलेल्या वडाच्या झाडाखाली उभे राहिले होते. त्यावेळी सर्व आरोपी आले आणि माझ्या पतीला विचारत होते की, त्यांच्या नावाची खोटी तक्रार का दाखल केली असे म्हणुन दमदाटी करू लागले. त्यावेळी अमोल ताठे यांनी काठीने माझ्या पतीच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारले. तसेच आरोपी उमेश भुजबळ यांनी माझ्या पतीच्या पाठीवर काठीने मारहाण केली. त्यावेळी आरडा—ओरड सुरू होती. आरोपी समाधान भुजबळ यांनी माझ्या पतीला लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यानंतर मी माझे दिर बाळासाहेब थोरात व माझा मुलगा गणेश थोरातला बोलावले. म्हणुन आम्ही आरडा—ओरड झाल्यामुळे घटनास्थळी गेलो. त्यावेळी आरोपी आम्हाला हि म्हणु लागले की, आमच्या नावाची खोटी तक्रार का केली असे म्हणुन आम्हाला पण लाथाबुक्क्याने मारहाण केली. आरोपींना मी ओळखु शकते. ते आज न्यायालयात हजर नाहीत. आता मला काठया दाखविल्या. ते त्याच आहेत ज्या काठयांनी माझ्या पतीला मारहाण केली.

**उलटतपास: आरोपींतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. डी. एन. भुजबळ:**

**२.** फिर्यादी हे माझे पती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची वस्ती तिनशे ते साडे तीनेशे लोकांची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, वडाचे झाड व आमचे घर यामध्ये ३०० ते ३५० मीटर अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित वडाच्या झाडाच्या पुर्वेस भैरवनाथाचे मंदीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, भैरवनाथाच्या मंदीराच्या पुर्वेस १०० मीटर मोकळी जागा आहे व त्यानंतर सुभाष ताठे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुभाष ताठे यांचे घराच्या नंतर दादाभाउ सिनलकर यांचा बंगला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दादाभाउ सिनलकर यांच्या घरानंतर राजाराम भुजबळ यांचे घर आहे व त्यानंतर आमचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनेच्या वेळी मी, माझा दिर व माझा मुलगा आमच्या घरामध्ये होतो.

**३.** आरोपी व आमच्यामध्ये पुर्वीपासुन थोडे थोडे वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, ते वाद जमिनीच्या बांधावरून व रस्त्यावरून होते. हे मला सांगता येत नाही की, शेतीचा वाद मिटविण्यासाठी मिटींग झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्याच दिवशी मी व माझे पती पोलिस

ठाणे येथे जावुन तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी पोलिस ठाणे येथे कधीही गेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविलेल्या काठया स्वयंपाकासाठी वापरल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या काठया सरपणासाठी सहज उपलब्ध होतात. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या काठया माझ्या पतीने पोलिसांना दिलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला काठीने मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेताचा वाद असल्यामुळे माझ्या पतीने खोटी फिर्याद दाखल केली.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनास्थळ व माझ्या घराच्या दरम्यान पाच ते सहा घरे असल्यामुळे मला घटनास्थळावरील काही दिसत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटना घडली त्यावेळी मी घरामध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्यामध्ये शेताच्या बांधावरून वाद असल्यामुळे खोटी फिर्याद दाखल केली व आज रोजी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास नाही. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
2025.11.28 17:02:59 +0530

**(सं. दि. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे.

ठिकाण : शिरूर.
दिनांक : २८/११/२०२५.